॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | **Public Relations Office (PRO)** | website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215325 | जनसंपर्क कार्यालय | E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/२५७ दि.२३/१२/२०२४

## 'स्वारातीम' विद्यापीठाची स्वयंसेविका अभिज्ञा मनुरकर यांची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी निवड




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नित लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेविका कु. अभिज्ञा मनुरकर यांची २६ जानेवारी, २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथे होणाऱ्या पथसंचलनासाठी निवड झाली आहे.

लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयाची व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वयंसेवकांची आर. डी. परेड दिल्ली साठी सलग तिसऱ्या वर्षी निवड झालेली आहे. अशी विक्रमी कामगिरी करणारे नांदेड विद्यापीठ व लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय हे महाराष्ट्रातील पहिलेच विद्यापीठ व महाविद्यालय ठरले आहे.

यापूर्वी याच महाविद्यालयातील विष्णू जाधव यांनी २६ जानेवारी २०२३ रोजी व कु. भाग्यश्री गैनवार यांनी २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथिल पथसंचलनात नांदेड विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेले आहे.

आर. डी. परेड दिल्ली साठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षेत्रातील १७००० राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांमधून अभिज्ञा मनुरकर हिची निवड झालेली आहे. महाराष्ट्रातील चार लाखाहून अधिक स्वयंसेवकांपैकी केवळ १४ स्वयंसेवकांची निवड करून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्यासाठी दिल्ली येथे पाठविले जाते.

त्यांच्या या निवडीबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अभिनंदन करून कु. अभिज्ञा मनुरकर यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी मोहम्मद शकील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, कार्यक्रमाधिकारी डॉ. संभाजी मनूरकर यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कर्मचारी ए. आय. शेख, तुकाराम हंबर्डे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---